रजि नं.U01100MH2021PTC35294

# अतुलनीय फार्मर्स प्रोड्युसर कं.लि.

पत्ता - विठाई बिल्डींग,गट नं.२५५,फुलंब्री-खुलताबाद रोड,वारेगांव,ता.फुलंब्री,जि.औरंगाबाद,पिन- ४३११११

जा.क्र.

दि.२७/ ०१/२०२३

अतुलनीय फार्मर्स प्रोड्युसर कंपनी लि. वारेगांव, ता.फुलंब्री कंपनीच्या संचालक मंडळाची बैठक फुलंब्री येथील कार्यालयात सकाळी ०९.३० वा. अध्यक्ष श्री. शिवेंद्र अतुल चव्हाण यांच्या अध्यक्षेतेखाली घेण्यात आली. बैठकीमध्ये खालील प्रमाणे कामकाज करण्यात आलेले असुन ठराव पारित करण्यात आलेला आहे.

**विषय क्र. १** - मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प (स्मार्ट) अंतर्गत सविनय प्रकल्प अहवाल सादर करणेबाबत.

**ठराव क्र.१** - मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प (स्मार्ट) अंतर्गत आपल्या कंपनीने सादर केलेल्या प्रस्तावास पत्र क्रं. जा.क्र.कृ.आ./आत्मा/स्मार्ट/मु.उ.मं.आ/२४३/२०२२ दि. २१/०४/२०२२ अन्वये मंजुरी प्रदान करण्यात आली होती. त्याचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशील | सीबीओने प्रस्तावित केलेल्या उपप्रकल्पाची रक्कम (रु. लाख) | समितीने शासकीय मापदंडानुसार ग्राह्य धरलेली रक्कम (रु. लाख) | समितीने मापदंडानुसार मंजूर केलेले अनुदान (रु. लाख) | मापदंडाची योजना / यंत्रणा |
|---|---|---|---|---|---|
| १ | Building Construction | | | | |
| १.१ | Construction of Drying Yard | ४८.७६ | ४८.७६ | २९.२६ | आवश्यकता व क्षमतेची तपासणी आणि SSR प्रमाणे अंदाजपत्रक व मुल्यांकनाच्या अटीवर मान्य |
| १.२ | Construction of Chain link Fencing | ७.७२ | ७.७२ | ४.६३ | |
| १.३ | Construction of Foundation | ११.१० | ०० | ०० | सायलो मापदंडाच्या मुळ किमतीत फाऊंडेशन अपेक्षित |
| २ | Cattle Feed | | | | |
| २.१ | Construction Of Cattle Feed Unit | १९.९० | | | मापदंड उपलब्ध नाहीत राज्य स्तरीय समितीच्या निर्णयानुसार |

Scanned with CamScanner

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २.२ | Cattle Feed Plant (२TPH) | १८.१९ | | | |
| ३ | Silo | | | | |
| ३.१ | Grain Silo १००० MT | ८५.०० | ८८.५० | ५३.१० | MOFPI |
| ३.२ | Grain Silo 500 MT Unit २ | १३४.०० | | | |
| ३.३ | Weighing Bridge (५० Ton) | ७.२१ | ७.०० | ४.२० | MOFPI |
| | Total Cost A | | १५१.९८ | ९१.१९ | |
| ४ | ५% Operative | | ७.६० | ४.५६ | |
| | Grant Total | | १५९.५८ | ९५.७५ | |

सदर प्रस्तावामधील धान्य साठवणुकीसाठी १००० मे.टन क्षमतेचा एक व ५०० मे. टन क्षमतेचे २ सायलो प्रस्तावित करण्यात आलेले होते. शासनाच्या मापदंडानुसार तसेच स्टिलच्या वाढलेल्या भरमसाठ किंमतीमुळे कंपनीस सायलो उभारणी शक्य नसल्यामुळे तसेच ड्राईंग यार्डची मा. प्रकल्प संचालक यांचे पत्र क्रं. प्र.स.आत्मा/मंजुरी आदेश/२२/२०२३ दि. १०/०१/२०२३ अन्वये मंजुरी रद्द करण्यात आल्यामुळे सुधारित प्रस्ताव सादर करण्यात यावा व या प्रस्तावात खालील प्रमाणे बाबींचा समावेश करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

| अ.क्र. | बाब | संख्या | अंदाजपत्रकीय किंमत (रुपये) | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | धान्य साठवणुकीसाठी गोदाम साईज २५.५४० चौ. मी. x २४.५४० चौ.मी. क्षमता १०६२ मे. टन | ०१ | १,१२,०५,९५३/- | |
| २ | पशुखाद्य युनिट, कच्चा माल साठवणुक व पशुखाद्य साठणुकीसाठी शेड १९.५४०X१४.५४० चौ. मी. | ०१ | ५१,५३,७५६/- | |
| ३ | २ मे. टन/तास क्षमतेचे पशुखाद्य निर्मिती युनिट | ०१ | ५२,५६,९००/- | |
| ४ | ४० केव्हीऐ क्षमतेचे सौर ऊर्जा निर्मिती | ०१ | २८,२२,२४०/- | |
| ५ | २० टन/तास क्षमतेचे हॉपर व एलिव्हेटर व कनव्हेयर पाईप सह | ०१ | ९,८५,३००/- | |
| ६ | २ टन/तास क्षमतेचे इलेक्ट्रिक मका ड्रायर | ०१ | ५८,७८,०००/- | |
| ७ | चैन लिंक फेन्सिंग २४० रनिंग मिटर | ०१ | ९,८९,९८६/- | |
| | एकूण रक्कम रुपये - | | ३,२२,९२,१३५/- | |

Scanned with CamScanner

वरील प्रमाणे बाबिंचा सुधारीत सविस्तर प्रस्ताव तातडीने सादर करण्यात यावा. असे सर्वानुमते ठरले.

सुचक - श्री. प्रभाकर गोविंदराव जाधव

अनुमोदक - सौ. द्वारकाबाई केशवराव जाधव

ठराव सर्वानुमते मंजुर

**विषय क्र. २** - मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प (स्मार्ट) अंतर्गत ठराव क्रं. १ मध्ये नमुद केल्यानुसार प्रस्तावित प्रकल्पासाठी समुदाय आधारित संस्थेकडे प्रस्तावित उप प्रकल्पाचा ४०% भाग भांडवल रक्कम उभारणी बाबत.

**ठराव क्र.२** - कंपनीच्या आजच्या बैठकीमधील ठराव क्रं. १ नुसार ३,२२,९२,१३५/- रु. चा प्रकल्प प्रस्ताव मंजुरीसाठी सादर करावयाचा आहे. सदरील प्रकल्पासाठी ४०% भाग भांडवल उभारणी बाबत सविस्तर चर्चा झाली. सर्व संचालक मंडळीने, कंपनी संचालक प्रवर्तक व सदस्याकडुन भाग भांडवल उभारणीसाठी सर्वानुमते मंजुरी दिली.

सुचक - श्री. निखील कल्याणराव चव्हाण

अनुमोदक - सौ. वैशाली विनोद सोनवणे

ठराव सर्वानुमते मंजुर

**विषय क्र. ३** - कंपनीच्या कामासाठी लागणाऱ्या पायाभुत सोई उपलब्ध करणेबाबत.

**ठराव क्र.३** - आपल्या शेतकरी कंपनीचे दैनंदिन कामकाज करण्यासाठी काही कार्यालयीन बाबी आवश्यक आहेत. त्यापैकी कंपनीच्या दैनंदिन व्यवहाराची नोंद विहित नमुण्यात होण्यासाठी टॅली सॉफ्टवेअरची आवश्यकता आहे. मे. साई सॉफ्ट इंन्फोसिस, ठाकरे नगर, एन-२, सिडको, औरंगाबाद यांचे कडुन टॅली सॉफ्टवेअर इन्स्टॉल करुन घेण्यात आलेले आहे.

सुचक - श्री. शिवेंद्र अतुल चव्हाण

अनुमोदक - श्री. प्रभाकर गोविंदराव जाधव

ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र ४** - कंपनीस व्यवसाय/उद्योग सुरु करण्यासाठी जागा भाडेपट्यावर घेणे बाबत.

**ठराव क्र.४** - आपल्या कंपनीचे गोडावुन पशु खाद्य युनिट, मका ड्रायर, सोलार युनिट, इत्यादी साठी किमान ३४ आर जागेची आवश्यकता आहे. या करीता सौ. अनुराधा अतुल चव्हाण रा.किनगांव, यांची फुलंब्री - खुलताबाद रोड लगत वारेगांव शिवारात गट नं. २५५ मध्ये जागा असुन आपल्या कंपनीस ३४ आर जागा देण्यास तयार असल्याचे सांगितले आहे. सदरील जागा मुख्य रस्त्यालगत, वीज व पाणी इत्यादी सोईचा उपलब्धता असल्यामूळे योग्य आहे. त्यामूळे सौ. चव्हाण यांची ३४ आर जागा २९ वर्षाकरिता नोंदणीकृत भाडेपट्ट्यावर घेण्यात आलेली आहे.

असे सर्वानुमते ठरले.
सुचक - सौ. द्वारकाबाई केशवराव जाधव
अनुमोदक - सौ. वैशाली विनोद सोनवणे
ठराव सर्वानुमते मंजूर

Scanned with CamScanner

**विषय क्र ५ -** कंपनीच्या दैनंदिन कामकाजासाठी कर्मचाऱ्याच्या नियुक्ती बाबत.

**ठराव क्र.५ -** कंपनीच्या कामकाज या पुढ जास्त वाढल्यामूळे कामाचा निपटारा वेळेवर होण्यासाठी सक्षम कर्मचारी असणे जरुरी आहे. त्यामूळे मुख्य कार्यकारी अधिकारी व हिशोबनिस असे दोन कर्मचारी तातडीने नियुक्ती करणे आवश्यक आहे. त्याकरीता योग्य त्या पात्रतेचे कर्मचारी तातडीने नियुक्त करण्यात यावे.असे सर्वानुमते ठरले. त्यानुसार श्री.कृष्णा बळीराम खरात, मुख्यकार्यकारी अधिकारी व श्री योगेश अशोकराव सोनवणे, हिशोबनिस यांना कंपनीच्या दैनंदिन कामकाजासाठी नियुक्त करण्यात आलेले आहे.

सुचक - श्री. निखील कल्याणराव चव्हाण

अनुमोदक - श्री. प्रभाकर गोविंदराव जाधव

ठराव सर्वानुमते मंजुर

**विषय क्र ६ -** सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे, पत्र व्यवहार करण्याचे अधिकार देणे बाबत.

**ठराव क्र ६ -** आपल्या शेतकरी उत्पादक कंपनीचा स्मार्ट योजनेंतर्गत गोडावून बांधकाम, पशुखाद्य युनिट, मका ड्रायर, सौर ऊर्जा, हॉपर, एलिव्हेटर कनव्हेयर व चैनलिंक फेन्सिंग, चा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे, कंपनीचा इतर सर्व प्रकारचा पत्र व्यवहार करणे या बाबत सविस्तर चर्चा होऊन दोन संचालकावर याची जबाबदारी सोपविण्यात यावी असे सर्वानुमते ठरले. त्यानुसार श्री. प्रभाकर गोविंदराव जाधव व श्री. निखील कल्याणराव चव्हाण यांना कंपनीचा पत्रव्यवहार, प्रस्ताव सादर करणे, कंपनीचा दैनंदिन कामावर नियंत्रण ठेवणे इत्यादी कामाकरीता सह्यांचे अधिकार देण्यात यावे. असे सर्वानुमते ठरले.

सुचक - श्री. शिवेंद्र अतुल चव्हाण

अनुमोदक - सौ. वैशाली विनोद सोनवणे

ठराव सर्वानुमते मंजूर.

**विषय क्र ७ -** बँक खात्यावर व्यवहार करण्यासाठी सहिचे अधिकार देण्याबाबत.

**ठराव क्र. ७ -** अतुलनिय शेतकरी उत्पादक कं.लि. वारेगांव चे बँक खाते भारतीय स्टेट बँक शाखा- फुलंब्री येथे असून, खात्यावरील व्यवहार मोठ्या प्रमाणावर वाढणार असल्यामुळे व बँक व्यवहार सुरळितपणे हातळण्यासाठी दोन संचालकांना खात्यावर व्यवहार करण्याचे अधिकार देणे बाबत सविस्तर चर्चा झाली त्यानुसार दोन संचालक श्री. प्रभाकर गोविंदराव जाधव व श्री. निखिल कल्याणराव चव्हाण यांना बँक खात्यावर व्यवहार करण्याचे अधिकार तसेच अनुषंगीक पत्रव्यवहार इत्यादी कामे पार पाडण्यासाठी अधिकृत करण्यात यावे. असे सर्वानुमते ठरले.

सुचक - सौ. द्वारकाबाई केशवराव जाधव

अनुमोदक - सौ. वैशाली विनोद सोनवणे

ठराव सर्वानुमते मंजूर.

उपस्थित सर्व संचालकाचे आभार मानून चहापानानंतर बैठक संपल्याचे अध्यक्षांनी जाहीर केले.

सत्यप्रत

संचालक

अतुलनीय फार्मर्स प्रोडयुसर कं. लि.

वारेगाव,ता. फुलंब्री जि. औरंगाबाद

Scanned with CamScanner

रजि नं.U01100MH2021PTC352941

# अतुलनीय फार्मर्स प्रोड्युसर कं.लि.

पत्ता - विठाई बिल्डींग,गट नं.२५५,फुलंब्री-खुलताबाद रोड,वारेगांव,ता.फुलंब्री,जि.औरंगाबाद,पिन- ४३११११

जा.क्र.

दि.27/01/२०२३

## उपस्थित असलेल्या संचालकाची यादी

| अ.क्र. | संचालक/प्रवर्तकाचे नांव | पद | पत्ता | सही |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. शिवेंद्र अतुल चव्हाण | अध्यक्ष | रा. किनगाव, ता. फुलंब्री. जि. औरंगाबाद | [signature] |
| २ | श्री. निखील कल्याण चव्हाण | सचिव | रा. वारेगाव, ता. फुलंब्री. जि. औरंगाबाद | [signature] |
| ३ | श्री. प्रभाकर गोविंदराव जाधव | संचालक | रा. वारेगाव, ता. फुलंब्री. जि. औरंगाबाद | [signature] |
| ४ | सौ. वैशाली विनोद सोनवणे | संचालिका | रा. वारेगाव, ता. फुलंब्री. जि. औरंगाबाद | वैशाली विनोद सोनवणे |
| ५ | सौ. द्वारकाबाई केशवराव जाधव | संचालिका | रा. सांजुळ, ता. फुलंब्री. जि. औरंगाबाद | सौ. द्वारका जाधव |

Scanned with CamScanner